# सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठान व 'नाट्यस्पंदन'चा अभिनव उपक्रम
# कारागृहाच्या भिंती निनादल्या देशभक्तीच्या स्फूर्तीस्वरांनी




एकीकडे कारागृहाच्या अभेद्य, दगडी, निर्जीव भिंतींच्या आतलं रुक्ष जीवन जगणारे बंदिवान आणि दुसरीकडे त्यांच्या शिक्षेची अंमलबजावणी करणारे कर्तव्यकठोर वातावरण यांच्यातील देशभक्तीच्या भावनांना चेतना दिली, ती वैद्यकीय व्यवसायातल्या सदैव दक्षतेने आणि काटेकोरपणाने ग्रासलेली दैनंदिनी पाळणाऱ्या वैद्यकीय व्यावसायिक – अर्थात डॉक्टर्स, यांनी; तीही अतिशय सुस्वरपणे.

कल्पनाही करवणार नाही अशाही गुन्ह्यांच्या कारणाने माणसासारखी माणसे डांबावी लागतात, पण त्यांच्याही भावना असतात आणि कितीही निढावलेले असले, तरी बंदिवानांच्याही मनात देशभावना जागृत असते, याचा अनुभव उपस्थितांना खरोखर सद्गदित करणारा ठरला. वेगवेगळया वयोगटातील कारागृहावासियांच्या मानसिक जडणघडणीबद्दल समाजात काहीही साहजिक समज असले, तरी देशभावनेतून समूहभावनेला गवसणी घालता येते याचा एक वस्तुपाठच या कार्यक्रमातून मिळू शकतो, हे या कार्यक्रमाने दाखवून दिले.

**'नाट्यस्पंदन' प्रतिष्ठान** या शहरातील डॉक्टरांच्या नाट्यादि कलागुणांच्या जोपासनेसाठी कार्यरत असलेल्या व शैक्षणिक, सांस्कृतिक कार्यास वाहून घेतलेल्या **सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठान** यांच्या वतीने कारागृहातील बांधवांसाठी देशभक्तीपर स्फूर्तीगीतांच्या गायनाचा अनोखा कार्यक्रम दि. १८ ऑगस्ट, रविवार रोजी लातूर जिल्हा कारागृहात सादर करण्यात आला. याप्रसंगी, नव्या जुन्या चित्रपट व चित्रपटबाह्य विविध जोशपूर्ण गीतांचे सादरीकरण करण्यात आले व सुस्वर गाण्यांनी कारागृहाचे वातावरण देशभक्तीने भारावून गेले. याप्रसंगी, 'जहाँ **डाल डाल पर सोने की चिडियां करती है बसेरा...**' या डॉ. सुधीर बनशेळकीकर यांच्या, '**चल अकेला, चल अकेला...**' या प्रा. डॉ. संतोष कुलकर्णी यांच्या, '**कर चले हम फिदा...**' या डॉ. व्यंकट येलाले यांच्या, '**संदेसे आते है....**' या डॉ. अमित उटीकरांच्या, तसेच डॉ. आरती सास्तूरकर, डॉ. उज्वला कुलकर्णी, वृषाली कुलकर्णी यांच्या '**ने मजसी ने....**' या गीतांना विशेष दाद मिळाली. कार्यक्रमात कु. वरदा, कु. सुखदा या बनशेळकीकर भगिनींसह चिमुकल्या बालकलाकारांच्याही सुरेल गीतांना प्रचंड सकौतुक प्रतिसाद मिळाला. डॉ. विनया बनशेळकीकर, डॉ. संजीवनी भातांब्रे, यांनीही सुंदर स्फूर्तीगीते सादर केली. विशेष म्हणजे कारागृह पोलीस कर्मचारी श्री. सतीश उबरंडे यांनीही '**है प्रीत जहॉ की रीत सदा ...**' हे सुंदर गाणे सादर केले. याप्रसंगी श्री. शिरीष पोफळे यांनी आपल्या जादूच्या प्रयोगांसह अभिनव पद्धतीने उद्घाटन करवून रंगत आणली.

सूत्रसंचालन डॉ. मिलिंद पोतदार यांनी केले. 'नाट्यस्पंदन'च्या प्रभारी अध्यक्षा डॉ. सौ. ऋजुता अयाचित, सचिव डॉ. मुकुंद भिसे, नाट्यकर्मी संजय अयाचित, डॉ. महेश भातांब्रे आदींची यावेळी उपस्थिती होती. कारागृह अधीक्षक श्री. राहुल जुटाळे, तसेच तुरुंगाधिकारी श्री. मधुकर चौधरी, श्री. तुकाराम मंदवाड, सुभेदार श्री. कलंबरकर, हवालदार श्री. मुंडे, पोलीस कर्मचारी श्री. काकड व इतर कर्मचारी यांच्या काटेकोर नियोजनातून हा अभिनव कार्यक्रम शिस्तीत पार पडला.